संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३९१/२०२२

नि. २४ लगत

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १**

**स्नेहा सुधाकर लंगवे**

**शपथेवर सुरु**

**पुढील सरतपास फिर्यादीतर्फे वकील श्री. डी. व्ही. ठाकुर यांचेतर्फे**

**१३.** माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील संपूर्ण मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला असून तो खरा व बरोबर आहे. सदर केसकामी मी खालील दस्तऐवज दाखल केले आहेत.

१. आरोपीने मला दिलेला दिनांक २०/०७/२०२२ रोजीचे सारस्वत को–ऑपरेटव्ही बँक शाखा कणकवली या बँकेचे आरोपीच्या खात्याचा रक्कम रुपये ५,००,०००/– चा मुळ धनादेश क्र. ०४९४६९ व रक्कम रुपये ६०,०००/– चा मुळ धनादेश क्र. ०४९४७३ असे दोन धनादेश दाखल केले आहेत. त्यावर आरोपीची सही आहे. सही मी ओळखते. मुळ धनादेशास **अनुक्रमे नि. २५ व २६** देण्यात येत आहे.

२. सदर धनादेश मी सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवती बँक शाखा सावंतवाडी येथे माझ्या खात्यावर वटण्याकरीता भरले असता ते दिनांक २८/०७/२०२२ रोजी न वटता परत आले. त्याबाबतचा चेक रिटर्न मेमो अभिलेखावर दाखल केले आहेत. त्यावर बँकेचा सही , शिक्का आहे. त्यास **अनुक्रमे नि. २७ व २८** देण्यात येत आहे.

३. त्यामुळे मी दिनांक ०४/०८/२०२२ रोजी आरोपीला धनादेशाची रक्कम मागण्याकरीता वकीलांमार्फत नोटीस पाठविली. सदर नोटीसीची स्थळप्रत मी दाखल केली आहे. त्यावर वकीलांची व माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. २९** देण्यात येत आहे.

४. मी आरोपीला नोटीस पाठवल्याबाबतची पोष्टाची पावती दाखल केली आहे. त्यास **नि. ३०** देण्यात येत आहे.

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३९१/२०२२

नि. २४ लगत

५. आरोपीला नोटीस मिळाल्याबाबतची दिनांक ०६/०८/२०२२ रोजीची पोहोच पावती अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर पोष्टाचा शिक्का आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **नि. ३१** देण्यात येत आहे.

६. गांव मौजे ओसरगांव, ता. कणकवली येथील गट क्र. २०९२/अ, २०९२/ब व २०९२/क या मिळकतींसंदर्भात दिनांक ८/३/२०२१ रोजी आरोपी व माझ्यामध्ये झालेल्या कराराची मुळ प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर त्यास **नि. ३२** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण

**आरोपी गैरहजर. आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

(जे.एम. मिस्त्री )

दिनांक- ०५/०१/२०२६ न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, सावंतवाडी.